**शासकीय वेबसाइट पर्यवेक्षण करण्यासाठी समिती गठीत करणे.**

# महाराष्ट्र शासन
## माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग
## शासन निर्णय क्रमांकः GAD-मातंसं०४९/३/२०१४

७ वा मजला, मंत्रालय

मुंबई - ४०० ०३२

तारीख: २१ जून, २०१४

**वाचा :-**

१. शासन परिपत्रक मातंसं२०१०/प्र.क्र.७८/३९ दि २२/०४/२०१०
२. शासन निर्णय, ई प्रशासन धोरण, मातंसं२०११/प्र.क्र.१२५/३९ दि. २३/९/२०११
३. शासन पत्र, वेबसाईट मार्गदर्शिका,DIT-१३/File०८/५५/३९ दि. २९/११/२०१३
४. शासन पत्र, वेबसाईट होस्टींग मार्गदर्शिका,GAD-मातंसं०७५/७/२०१३-DIR(MH) दि. ३०/०९/२०१३

**प्रस्तावना :-**

शासनाच्या कामात गतिमानता पारदर्शीपणा आणण्याकरीता राज्य शासनाने ई -प्रशासन धोरण दि. २३ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेले आहे. तसेच वर नमूद केलेल्या क्रमांक २ व ३ च्या शासन पत्रानूसार वेबसाईट मार्गदर्शिका व वेबसाईट होस्टींगबाबत मार्गदर्शिका सर्व विभागांना पाठविण्यात आली आहे. या शिवाय सिडॅकच्या सेंटर ऑफ एक्सलन्सव्दारे वेबसाईट विकसनाच्या प्रमाणकांच्याबाबत ( जसे जीआयजी डब्ल्यू, एक्सीसीब्लीटी, लोकलायझेशन इत्यादि ) प्रशिक्षणही सुरु झाले आहे. ई प्रशासन धोरणानुसार शासनाचे कामकाज पारदर्शी असणे आवश्यक आहे. म्हणुन शासनाच्या अखत्यारितील सर्व विभाग/कार्यालये/मंडळे/महामंडळे यांची अद्ययावत माहिती त्यांच्या वेबसाइट असणे आणि तयार केलेल्या वेबसाईट प्रमाणकानूसार असणे अनिवार्य आहे. ई प्रशासन धोरणानुसार राज्यातील जवळ जवळ सर्व विभाग कार्यालये/विभाग/मंडळे/महामंडळे यांनी आपल्या स्वत:च्या वेबसाइट तयार केलेल्या आहेत. आणि त्यावर माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु असे निदर्शनास आलेले आहे की, बऱ्याच संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी अद्यावत करण्यात येत नाही आणि प्रमाणकानूसार विकसित केल्याचे दिसून येत नाही. परिणामी अशी कालबाह्य माहिती नागरीकांना निरोपयोगी ठरते.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर शासनाच्या वेगवेगळया विभागांच्या आणि त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये/विभाग/मंडळे/महामंडळे यांच्या वेबसाइट नियमितपणे परिक्षण करून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविण्याकरीता एक पर्यवेक्षण समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या समितीची रचना खालील प्रमाणे असेल.

**समितीची रचना :-**

१. भारतीय प्रशासन सेवेतील निवृत्त अधिकारी - अध्यक्ष

२. प्रधान सचिव माहिती तंत्रज्ञान - सदस्य

३. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) - सदस्य

४. सेटर ऑफ एक्सलन्सचा प्रतिनीधी - सदस्य

५. संचालक, माहिती तंत्रज्ञान - निमंत्रक

**कार्यकाल:-** या समितीचा कार्यकाल समिती गठीत झाल्यापासून दोन वर्षाचा राहील.

**समितीची कार्यकक्षा** :-

१. ही समिती शासनाचे विभाग, आणि त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये/विभाग/मंडळे/महामंडळे यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या माहितीचे निरीक्षण करेल. समितीने निश्चित केलेल्या ५०-६० लोकाभिमूख वेबसाईटचे पर्यवेक्षण करण्यात येईल. या समितीची दर महिन्यात एक बैठक होईल. राज्यातील प्रत्येक वेबसाईटचे सहा महिन्यात किमान एकदा पर्यवेक्षण होईल अशा पध्दतीने समिती काम करेल.

२. संकेतस्थळांच्या माहितीचे निरीक्षण करण्यासाठी समिती या क्षेत्रातील जाणकार व्यक्तीची नियुक्ती करील. ही व्यक्ती वेबसाइटचे दैनंदिन निरीक्षण करणे, राज्यातील सर्व वेबसाईटची यादी तयार करणे, विभागांशी समन्वय करणे, बैठकीचे कार्यवृत्त तयार करणे व समितीने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करेल.

३. वेबसाइटचे निरीक्षण करणे तसेच समितीला मदत करण्यासाठी संबंधीत विभागातील उअपसचिव/सहसचिव(आस्थापना) हे विभाग /कार्यालये/मंडळे/महामंडळे कार्यालयांकडून कार्यालयातील जबाबदार व्यक्तींची नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही करतील. तसेच हे नोडल अधिकारी या बैठकीला उपस्थित राहतील याची जबाबदारी घेतील.

४. ही समिती वेबसाइटच्या निरीक्षणाच्या कामाचा दर महिन्यांत आढावा घेईल आणि वेबसाइटवरील माहितीचे अद्यावतीकरण करण्यासंबंधी आवश्यक त्या सुचना / शिफारशी संबंधीत विभागांना करेल. संबंधित विभागाचे सचिव समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर समितीने केलेल्या सूचना/शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला १० दिवसात सादर करतील. समितीने केलेल्या शिफारशी व सूचना यांची अंमलबजावणी न करणा-या विभागांची/कार्यालयाची यादी शासनास व मा. मुखमंत्री महोदयाना सादर करेल.

५. समितीवर नियूक्त केलेला सिडॅक-सिओईच्या प्रतिनिधीचे कार्य खालील प्रमाणे राहील.

अ) वेबसाईट जीआयजी डब्ल्यू, एक्सीसीब्लीटी, लोकलायझेशन आणि शासनाच्या ई प्रशासन धोरणा नुसार वेबसाइट तयार करण्यात आली आहे किंवा कसे याची तपासणी करणे.

ब) सर्व डेव्हलपर/टिम लिडर यांना महाऑनलाईनच्या मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद येथील कार्यालयात जीआयजी डब्ल्यू, एक्सीसीब्लीटी, लोकलायझेशन या संदर्भातील ५ दिवसांचे प्रशिक्षण उपलब्ध करणे.

सदर प्रशिक्षण मोफत राहील. (प्रशिक्षणासंबंधीची माहिती egovtraining.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे) हे प्रशिक्षण शासनाच्या वेबसाईट डेव्हलपमेंट संबंधीचे काम करण्यासाठी आवश्यक राहील.

क) शासनाच्या वेबसाईट अधिक लोकाभिमूख होण्यासाठी त्या मोबाईल, टॅबलेट इत्यादी उपकरणांवर कार्यान्वित होतात किंवा कसे याबाबत तपासणी करणे.

ड) माहिती तंत्रज्ञान विभागाच्या पदतालिकेवर असलेल्या संस्थेकडून संबंधित वेबसाईटचे सेक्युरीटी ऑडिट केले आहे किंवा कसे याची तपासणी करणे.

६. समितीच्या अध्यक्षांना रु. ५०००/- प्रती बैठक मानधन देय राहिल. संकेतस्थळांच्या माहितीचे निरीक्षण करण्यासाठी समितीने नियुक्त केलेल्या जाणकार व्यक्तीचे मानधन कामाच्या आवाक्यानुसार ठरविण्याचा अधिकार समितीला राहिल. शासनाच्या व NIC प्रतिनिधींना मानधन राहणार नाही.

७. या समितीच्या मानधन आणि कामकाजावर होणारा खर्च राज्य सेतु सोसायटीच्या सोसायटीच्या निधीमधुन भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६२११५४५५४९४११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJESH MADANLAL AGGARWAL

Digitally signed by RAJESH MADANLAL AGGARWAL
DN: c=IN, o=ALL INDIA SERVICES, ou=IAS, postalCode=110001, st=NEW DELHI, cn=RAJESH MADANLAL AGGARWAL
Date: 2014.06.21 16:30:26 +05'30'

( राजेश अग्रवाल )
प्रधान सचिव, (मातं) , महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव

७) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
८) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई)
१३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, नागपूर)
१४) महालेखापाल, (लेखा परीक्षा , महाराष्ट्र, मुंबई )
१५) महालेखापाल, लेखापरीक्षा महाराष्ट्र, नागपूर
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई व नागपूर
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९) सर्व पोलीस आयुक्त
२०) सर्व विभागीय आयुक्त,
२१) सर्व जिल्हाधिकारी,
२२) सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२३) सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी
२४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२५) पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
२६) सर्व मंत्रालयीन विभाग
२७) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई
२८) मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२९) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३०) निवड नस्ती (२ प्रती)